महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/12 वी परीक्षा/3299
दिनांक : 16/02/2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/कोल्हापूर.

**विषय:-** **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा मार्च 2024 करिता प्रविष्ठ खेळाडू विद्यार्थ्यांस सवलतीचे वाढीव गुण देणेबाबत.....**

**संदर्भ:-** 1) **शासन निर्णय क्र.उमाशि-2015/प्र.क्र.262/एस.डी.2 दि.20 डिसेंबर, 2018**
2) **शासन शुध्दीपत्रक क्र.उमाशि-2015/प्र.क्र.262/एस.डी.2 दि.25 जानेवारी, 2019**
3) **राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा-7/6711 दि.12/12/2022 रोजीचे पत्र**

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीचे वाढीव गुण मिळणेबाबतचे परीपुर्ण प्रस्ताव उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद तरतुदीनुसार **दि.05/04/2024 पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावेत.**

सदर प्रस्ताव सादर करताना छाननी शुल्क प्रती विद्यार्थी रु.25/- (अक्षरी रु.पंचवीस फक्त) भरणा केलेले बँक ऑफ इंडियाचे मूळ चलन अथवा या कार्यालयामध्ये रोखीने भरणा केलेली पावती जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे प्रस्तावासोबतच देण्यात याव्यात. अन्यथा प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

कोणताही पात्र विद्यार्थी सदर सवलतीच्या गुणांपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. **दि.05/04/2024 अखेर** जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :**

क्रीडा अधिकारी, सातारा / सांगली / कोल्हापूर

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीचे वाढीव गुण मिळणेबाबतचे कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या परीपुर्ण प्रस्तावांची छाननी करुन **दि.30/04/2023 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत** आपल्या स्पष्ट शिफारशीसह मंडळ कार्यालयास हस्तपोहोच सादर करावेत. सदर प्रस्ताव स्विकारत असताना प्रस्ताव छाननी शुल्क प्रती विद्यार्थी रु.25/- (अक्षरी रु. पंचवीस फक्त) भरणा केलेले बँक ऑफ इंडियाचे मूळ चलन अथवा या कार्यालयामध्ये रोखीने भरणा केलेली पावती प्रस्तावासोबत जमा करुन घेण्यात यावी.

**प्रत माहितीस्तव :** शिक्षणाधिकारी (माध्य.), सातारा / सांगली / कोल्हापूर